आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२१ फेब्रुवारी २०२५ शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ९८ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनानिमित्त नवी दिल्लीत ग्रंथ दिंडीचं आयोजन, दुपारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उद्घाटन

- अमेरिकेत एफबीआयच्या संचालकपदी काश पटेल यांची नियुक्ती

- भारतीय वन्यजीव शास्त्रज्ञ पूर्णिमा देवी बर्मन यांना टाईम मासिकाचा 'वुमन ऑफ द इयर' सन्मान

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत विदर्भाविरुद्धच्या सामन्यात मुंबई पराभवाच्या छायेत

**<><><><><>**

नवी दिल्लीत आजपासून ९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरू होत आहे. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर पहिल्यांदा, ७१ वर्षानंतर हे संमेलन नवी दिल्लीत होतंय. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारं हे पहिलंच संमेलन आहे. त्यानिमित्त सकाळी ग्रंथ दिंडी काढण्यात आली. त्यात विविध साहित्यिक, राजकारणी, साहित्य प्रेमी, चित्ररथ सहभागी झाले होते.

डॉ. तारा भवाळकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाचं उद्घाटन दुपारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. संमेलनाचे स्वागताध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित असतील. संध्याकाळी साडे ६ वाजता माजी केंद्रीय मंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली दुसरे उद्घाटन सत्र होईल. त्यात गेल्या संमेलनाचे अध्यक्ष रवींद्र शोभणे आणि या संमेलनाच्या अध्यक्ष तारा भवाळकर यांचं भाषण होईल. दिल्लीतल्या तालकटोरा क्रीडा संकुलात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरीत तीन दिवस

चालणाऱ्या या संमेलनात, मान्यवरांच्या मुलाखती, बहुभाषिक कवी संमेलन, विविध विषयावर परिसंवाद, आदी कार्यक्रम होणार आहेत.

राज्य सरकारनं या संमेलनाला एकूण ४ कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

जागतिक पातळीवरचे कल लक्षात घेऊन भारतीय पद्धतीचा अवलंब करणारं नेतृत्त्व भारताला गरजेचं असल्याचं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज व्यक्त केलं. आज नवी दिल्लीत पहिल्या स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशीप - सोल परिषदेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. भारत जागतिक स्तरावर एक शक्तिशाली केंद्र म्हणून उदयाला येत असून देशाला प्रत्येक क्षेत्रात कार्यक्षम नेतृत्वाची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. स्कूल ऑफ अल्टिमेट लीडरशिपची स्थापना ही विकसित भारताच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल असून राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करू शकतील असे नेते यामुळे घडले जातील, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

**होल्ड बाईट पीएम ( २० सेकंद)**

या परिषदेला भूतानचे प्रधानमंत्री दाशो त्शेरिंग तोबगे देखील उपस्थित होते. सोल ही प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संकल्पना असून प्रामाणिक नेत्यांना घडवण्यासाठी प्रधानमंत्र्यांच्या वचनबद्धतेचा हा एक पुरावा असल्याचं ते म्हणाले. आजपासून दोन दिवस चालणारी ही परिषद विविध क्षेत्रातल्या नेत्यांना त्यांचा प्रेरणादायी जीवन प्रवास सांगण्यासाठी एक प्रमुख व्यासपीठ असेल.

**<><><><><>**

देशातल्या नागरिकांचा आरोग्यविषयक खर्च गेल्या दहा वर्षांत ६४ टक्क्यांवरून ३९ टक्क्यापर्यंत खाली आला असल्याचे केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्लीत आयोजित आंतरराष्ट्रीय आरोग्य

संवाद २०२५ या उपक्रमाच्या १२ व्या पर्वाला संबोधित करत होते. केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेसह, राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि इतर योजनांअंतर्गत दिल्या जाणाऱ्या सेवांमुळे ही घट झाली असल्याचं ते म्हणाले. सद्यस्थितीत आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत देशातल्या सुमारे ४० टक्के लोकसंख्येला लाभ मिळत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

जेनेरिक औषध केंद्रांच्या धर्तीवर आयुष औषध केंद्र सुरु करणार असल्याची माहिती केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली आहे. तसंच भविष्यात आयुष मंत्रालयाच्या कामकाजात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यात येणार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल धन्वंतरी पुरस्कार वितरण सोहळा आणि ‘देश का प्रकृती परीक्षण’ मोहिमेच्या पहिल्या टप्प्याचा समारोप कार्यक्रमात ते बोलत होते. देश का प्रकृति परीक्षण अभियानाचा पहिला टप्पा २५ डिसेंबर रोजी यशस्वीरित्या पूर्ण झाला. या अभियानात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या राज्यांचा तसंच आयुर्वेदिक महाविद्यालयांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी वैद्य माया राम उनियाल, वैद्य ताराचंद शर्मा, वैद्य समीर गोविंद जमदग्नी यांना धन्वंतरी पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

**<><><><>**

अमेरिकन तपास संस्था एफबीआयच्या संचालकपदी काश पटेल यांची नियुक्ती झाली आहे. समाज माध्यमावर केलेल्या एका पोस्ट मध्ये पटेल यांनी त्यांच्या निवडीबद्दल राष्ट्राध्यक्ष ट्रम्प आणि ॲटर्नी जनरल बोंबी यांचे आभार मानले आहेत. अमेरिकेच्या सिनेटने काल रात्री पटेल यांच्या नियुक्तीला मान्यता दिली. न्यायव्यवस्थेचं राजकीयीकरण थांबवून जनतेचा एफबीआय वरचा विश्वास पुन्हा निर्माण करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं आहे. काश पटेल हे चीफ ऑफ स्टाफ राहिले आहेत. ते १० वर्षे एफबीआयचे संचालक राहतील.

**<><><><><>**

भारतीय वन्यजीव शास्त्रज्ञ पूर्णिमा देवी बर्मन यांना टाईम मासिकानं "वुमन ऑफ द इयर" म्हणून सन्मानित केलं आहे. या यादीत स्थान मिळवणाऱ्या पूर्णिमा देवी या एकमेव भारतीय महिला आहेत. आसाममध्ये दुर्मिळ होत असलेल्या हरगिला म्हणजेच मोठा करकोचा या पक्षाच्या संरक्षणासाठी त्या प्रयत्न करत आहेत.  जगात अतिशय दुर्मिळ असलेल्या या प्रजातींच्या घट झाल्यामुळे या भागात करकोचा पक्षाच्या फक्त साडेचारशे प्रजाती उरल्या आहेत. मात्र बर्मन यांच्या अथक प्रयत्नांमुळे आसाममध्ये या पक्षाची लोकसंख्या अठराशेहून अधिक झाली आहे.

**<><><><><>**

इस्त्रायलमध्ये तेल अवीवजवळच्या बात याम इथं तीन बसमध्ये स्फोट झाले. या स्फोटांमध्ये कोणीही जखमी झाल्याचं वृत्त नाही. मात्र या स्फोटांमुळे इस्त्रायलमधील वाहतूक तात्पुरती थांबवण्यात आली. दरम्यान, या स्फोटांमध्ये कोणताही सहभाग नसल्याचं हमासनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत मुंबई आणि विदर्भ यांच्यात सुरू असलेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात मुंबई पराभवाच्या छायेत आहे. या सामन्यात विजयासाठी ४०६ धावांचा पाठलाग करताना, दुसऱ्या डावात मुंबईच्या ६ बाद २१० धावा झाल्या होत्या.

आज सामन्याच्या पाचव्या दिवशी मुंबईनं आपला दुसरा डाव कालच्या ३ बाद ८३ या धावसंख्येवरून पुढे सुरू केला मात्र शिवम दुबे, सुर्यकुमार यादव आणि आणि आकाश आनंद हे मुंबईचे फलंदाज झटपट माघारी परतले. त्यानंतर शम्स मुलानी आणि शार्दुल ठाकूर यांनी अर्धशतकी भागीदारी  करत मुंबईचा डाव सावरला.

मुंबईनं हा सामना अनिर्णित राखण्यात यश मिळवलं तरी विदर्भानं पहिल्या डावात आघाडी मिळवल्यानं ते अंतिम फेरीत जाऊ शकणार आहेत.

दरम्यान अहमदाबाद इथं गुजरात आणि केरळ यांच्यात सुरू असलेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात आज पाचव्या दिवशी केरळनं गुजरातवर पहिल्या डावात २ धावांची नाममात्र पण महत्वाची आघाडी मिळवली. या सामन्यात केरळनं पहिल्या डावात सर्वबाद ४५७ धावा केल्या होत्या. त्यानंतर त्यांनी गुजरातचा पहिला डाव ४५५ धावांत रोखला. आज सामन्याचा अखेरचा दिवस असल्यानं, हा सामना अनिर्णित राहण्याची शक्यता आहे, मात्र पहिल्या डावातील दोन धावांच्या महत्वाच्या आघाडीच्या जोरावर केरळचा अंतिम फेरीत पोहचण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

**<><><><><>**

चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज पाकिस्तानात कराची इथल्या मैदानावर अफगाणिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात 'ब' गटातील सामना होणार आहे.

भारतानं काल बांगलादेशवर ६ गडी राखून  मात करत या स्पर्धेत विजयी सलामी दिली. बांगलादेशच्या संघानं प्रथम फलंदाजी करत भारतापुढे २२९ धावांचं आव्हान ठेवलं; त्याला प्रत्युत्तर देताना ४७ व्या षटकातच भारतीय संघानं विजय साकार केला. शुभमन गिलनं शतकी खेळी केली. त्याला सामनावीर पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. रोहित शर्मानं ४१ तर विराट कोहलीनं २२ धावा काढल्या.

**<><><><><>**

महिला प्रिमीअर लिग क्रिकेट स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळूरूचा सामना मुंबई इंडियन्ससोबत होणार आहे. चेन्नई इथं संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

या स्पर्धेत बंगळुरूनं या आधी झालेले आपले दोन्ही सामने जिंकले आहेत, तर मुंबईनं दोन सामन्यांपैकी एक सामना जिंकला, तर एका सामन्यात त्यांना पराभव स्विकारावा लागला.

**<><><><><>**

कतार खुल्या टेनिस स्पर्धेत आज पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत भारताचा युकी भांबरी आणि त्याचा क्रोएशियन जोडीदार इव्हान यांचा सामना ब्रिटनच्या लॉईड ग्लासपूल आणि ज्युलियन कॅश या जोडीशी होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार संध्याकाळी ५ वाजून ४० मिनिटांनी हा सामना सुरू होईल.

भांबरी आणि डोडिग या जोडीनं उपांत्यपूर्व फेरीत क्रोएशियाच्या मेट पाविच आणि एल साल्वाडोरच्या मार्सेलो या जोडीवर मात केली. या सामन्यात पहिला सेट गमावल्या नंतरही दमदार पुनरागमन करत त्यांनी सामना २-६, ६-३, १०-८ असा जिंकला.

**<><><><><>**

पुणे ओपन चॅलेंजर टेनिस स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत आज भारताच्या जीवन आणि विजय सुंदर प्रशांत या जोडीचा सामना भारताच निकी पूनाचा आणि त्याचा झिम्बाब्वेचा जोडीदार कर्टनी जॉन लॉक यांच्याशी होणार आहे. आज दुपारी साडेतीन वाजता हा सामना सुरू होईल.

उपांत्यपूर्व फेरीत जीवन आणि विजय सुंदर प्रशांत या जोडीनं साकेत आणि रामकुमार या जोडीचा पराभव केला. तर पूनाचा आणि लॉक या जोडीनं ऑस्ट्रेलियाच्या ट्रिस्टन आणि ब्लेक एलिस यांना पराभूत करत उपांत्य फेरी गाठली.

**//<><><><><>//**